## रे.मु.नं.७५/२०११ मधील निशाणी क्रमांक ४५ वरील आदेश
(CNR No.MHAH08-002661-2014)

सदरचा अर्ज वादीने ऊसतोड व ऊसाची लागण करण्याकरीता पोलिस मदत मिळणेकामी दाखल केला आहे.

२. अर्जातील कथने थोडक्यात पुढीलप्रमाणे :

सदर दाव्यात प्रतिवादींविरुध्द दरम्यानचा मनाई हुकूम दिला आहे. त्याप्रमाणे प्रतिवादींनी वादींना अ, ब, क, ड या रस्त्यास हरकत अडथळा करायचा नाही असा हुकूम केला आहे. त्यानंतर मोजणी, फाळणी, इ. गोष्टी झाल्या. परंतु ताबे आहेत तसेच आहेत. वादीचे गट नं. ३१ मध्ये ०.६१ गुंठे क्षेत्रात ऊस आहे. तो गळीतास आहे. मनाई हुकूम अस्तित्वात असतांना प्रतिवादींनी वादीच्या रस्त्यास हरकत घेतली व रस्त्याचे वापरास बंदी केली आहे. त्यामुळे वादीचे उर्वरीत गट नं.३१ मध्ये क्षेत्र पडीत पडले आहे.

३. वादीचे ०.६१ गुंठे ऊसाची तोड होईपावेतो व ऊसाची लागण करण्याकरीता पोलिस मदत मिळणे आवश्यक आहे. त्याशिवाय प्रतिवादी जुमानणार नाही. त्यामुळे वादीस दावा मिळकत गट नं.३१ मधील ऊसाची तोडणी व ऊसाची लागण करणेकरीता ३ दिवस एक महिला व एक पुरुष पोलिस यांची मदत मिळावी. तसे झाल्यास प्रतिवादींचे काही नुकसान होत नाही. सबब, प्रस्तूतचा अर्ज दाखल केला आहे.

४. प्रतिवादींनी सदरच्या अर्जास अर्जावरच आपले म्हणणे दिले आहे. वादीने प्रतिवादींकडून मोठी रक्कम घेऊन जमिनीचे खरेदीखताकामी विसारपावती केली व नंतर खरेदीखत करुन देण्याची टाळाटाळ केली. मोजणी होताच अतिक्रमण काढून देण्याचे मान्य करुनही वादीने टाळाटाळ केली आहे. वादीने गट नं.३१/४, ३१/६ व ३१/८ मधील १ हेक्टर क्षेत्र प्रतिवादीस विकण्याचे ठरवून मोठी रक्कम घेतली आहे. दावा चालू असतांना मिळकतीचे हस्तांतरण बक्षिसपत्राने मुलांचे नावे केले आहे. वादीने जमीन प्रतिवादीस विकण्याचे मान्य केल्यानंतर वादी जमिनीत आलाच नाही. त्यामुळे जमिनीतला ऊस आडविण्याचा प्रश्न आला नाही. सबब, अर्ज खर्चासह रद्द करण्यात यावा.

५. दोन्ही बाजूंचे सुविद्य वकीलांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

६. प्रस्तूत दाव्यातील अभिलेखाप्रमाणे दावा कोर्ट कमिशनर यांचा अहवाल प्राप्त होणेवर नेमलेला आहे. तसेच प्रतिवादींविरुध्द वाद रस्त्यास प्रतिवादींनी हरकत अडथळा करु नये असा तात्पुरता मनाई हुकूम निशाणी ५ वादीचे लाभात कोर्टाने दिलेला आहे. अशा परिस्थितीत वादीने सदरचा पोलिस मदतीचा अर्ज दाखल केला आहे.

७. वादीचे कथनानुसार गट नं.३१ मध्ये ०.६१ गुंठे क्षेत्रात ऊस असून तो गळीतास आहे. प्रतिवादींनी वादीचे रस्त्यास हरकत घेतली आहे. रस्ता वापरास बंदी केली आहे. तसेच वादीचे उर्वरीत गट नं.३१ मधील क्षेत्र पडीत पडले आहे. वादीचे गट नं.३१ मधील ०.६१ गुंठे क्षेत्रातील ऊसतोड करणे व ऊसाची लागण करणेकरीता पोलिस मदतीची मागणी या अर्जाद्वारे केली आहे. सदरच्या अर्जाचे पुष्टयर्थ वादीने प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

८. प्रतिवादींचे कथनानुसार वादीने जमीन त्यास विकण्याचे मान्य केल्यानंतर वादी जमिनीत आलाच नाही. त्यामुळे जमिनीतला ऊस अडविण्याचा प्रश्न आला नाही असे नमूद केले आहे. प्रतिवादींकडून जमिनीची मोठी रक्कम घेऊन दावा चालू असतांना वादीने जमीन मुलांचे नावे बक्षिसपत्राने करुन दिली आहे. त्यामुळे वादीचा जमिनीवर ताबा नाही.

९. वादीतर्फे वकीलांनी आपले युक्तिवादीचे पुष्ट्यर्थ मांगीलाल वि. इचकूदेवी व इतर (ए.आय.आर.१९९९ राजस्थान ६) या पायंड्यावर आपला भर दिला आहे. त्यानुसार हरकत अडथळा काढून मिळणेसाठी पोलिस मदतीचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ नुसार चालू शकतो. याउलट, प्रतिवादींतर्फे वकीलांचे युक्तिवादानुसार सदरचा पायंडा प्रस्तूतच्या अर्जास लागू पडत नाही. कारण पायंड्यातील नमूद बाबी व वाद विषय भिन्न आहेत. सदर आधारभूत पायंड्याचे वाचन केले. परंतु, सदर पायंडा त्यातील पुर्णत: भिन्न बाबींचे कारणास्तव वादीस मदतगार ठरत नाही.

१०. प्रतिवादींनी दाखल केलेल्या स्पे.मु.नं.१९/१८ चे दाव्याची छायांकीत प्रत व फेरफार नोंदी व ७/१२ चे उता-याचे छायांकीत प्रती युक्तिवादाचे पुष्ट्यर्थ दाखल केले आहे. परंतु, सदर पुरावा छायांकीत प्रतीचे स्वरुपात असल्याने तो ग्राहय धरला जावू शकत नाही. वादीने गट नं.३१ मधील ०.६१ गुंठे ऊसाची तोड होऊन ऊसाची लागण करणेकरीता पोलिस मदत मिळण्याची मागणी केली आहे. परंतु, वादीचे प्रतिज्ञापत्राशिवाय अर्जात नमूद केल्याप्रमाणे वादीचा ०.६१ गुंठे क्षेत्रात ऊस असल्याचा प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर नाही. वादीने जमीन प्रतिवादींना विक्री करण्याचे ठरवून नंतर वादी कधीही जमिनीत आला नाही असे जरी नमूद केले असले तरी त्याबद्दलचा देखील कोणताही प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर आणलेला नाही.

११. अशा परिस्थितीत वादीचे ०.६१ गुंठे क्षेत्रातील ऊसाची तोड करणेकामी केवळ पोलिस मदत दिल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, ऊसाची तोड न झाल्यास त्यामुळे वादीचे नुकसान होणार आहे. दाव्यातील विरोधी कथनांचा विचार करता वादीचे ०.६१ गुंठे क्षेत्रातील ऊसाची तोड करणेकरीता मात्र एक महिला व एक पुरुष पोलिसाची मदत मिळणे न्यायोचित होणार आहे. तथापि, ऊसाची लागण करणेकरीता वादीस कोणतीही पोलिस मदत देणे निश्‍चितच न्यायोचित होणार नाही. त्यामुळे सदरचा अर्ज अंशत: मंजूर करण्यात येत आहे. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज (निशाणी ४५) खर्चाशिवाय अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

२. परिणामत: मौजे मांडवे बु. येथील गट नं.३१ मधील ०.६१ गुंठे क्षेत्रातील ऊस तोड करणेकामी मात्र एक महिला व एक पुरुष पोलिस यांची मदत पोलिस निरीक्षक, घारगाव पोलिस स्टेशन, ता. संगमनेर यांनी वादीस द्यावयाची आहे.

३. सदर पोलिस मदतीचा खर्च वादीने सोसावयाचा आहे.

( एन. एल. येवलेकर )
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
संगमनेर

दि.१६/०४/२०१८.